
उलट्या
पायांची
म्हातारी
निरंजन कुलकर्णी

# उलट्या पायांची म्हातारी

## निरंजन कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

# उलट्या पायांची म्हातारी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

उलट्या पायांची म्हातारी (कथा)

निरंजन कुलकर्णी

Flat No-102, Pandurang Residency, near OYO Twin tower,

Laxmi Chowk, Hinjewadi, 411057

Mobile No- 7020046267

Email id – kulkarni.niranjan01@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com


प्रकाशन : ८ जून २०२०

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.
- ©esahity Pratishthan®2020




माझं नाव निरंजन प्राणेश कुलकर्णी. व्यवसायाने मी चार्टर्ड अकौंटंट आहे. मला वाचनाची तसेच फोटोग्राफीची आवड आहे. फोटोग्राफी म्हटलं की फिरणं आलंच. त्यामुळे मला फिरायला देखील खूप आवडतं. तसं तर मी सगळ्याच प्रकारचं साहित्य वाचतो. मग ते ऐतिहासिक असो किंवा प्रवासवर्णन असो. पण मला गुढकथा आणि भयकथा सर्वात जास्त आवडतात. आवड्ते लेखक म्हणाल तर बरेच आहेत. पण त्यातही नारायण धारप, रत्नाकर मतकरी, सुहास शिरवळकर आणि जी. ए कुलकर्णी हे माझे सर्वात जास्त आवडते लेखक आहेत. या सर्व दिग्गजांच्या कथा – कादंबऱ्या वाचता वाचता आपणही थोडफार लिहू शकतो असं मला जाणवलं आणि आत्तापर्यंत वाचलेल्या साहित्यातून प्रेरणा घेऊन मी माझ्या लेखन प्रवासाला सुरुवात केली. आत्तापर्यंत मी तीन दीर्घकथा तसेच काही लघुकथा लिहिल्या आहेत. यापूर्वी माझ्या चार कथा ‘शापित कॅमेरा’ , ‘मोठ्या मनाचा माणूस’ , ‘चांदणी रात्र’ व ‘ वेडा बाळू’ इ – साहित्य वर प्रकाशित झाल्या आहेत. इ – साहित्य सारखं व्यासपीठ माझ्यासारख्या नवोदित लेखकांसाठी पर्वणीच आहे. त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल तसेच माझ्या कथा तुमच्यासारख्या उत्साही वाचकांपर्यंत पोहोचवल्याबद्दल इ – साहित्यचे मन:पूर्वक आभार.

- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/veda_balu.epub
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/veda_balu_niranjan_kulkarni.pdf
  http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chaandani_ratra_niranjan_kulkarni.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shapeet_camera_niranjan_kulkarni.pdf
- http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mothya_manacha_manus_niranjan_kulkarni.pdf




निरंजन कुलकर्णी
चांदणी रात्र



वेडा बाळू
निरंजन कुलकर्णी
epub
3



निरंजन कुलकर्णी
मोठ्या
मनाचा
माणूस



निरंजन कुलकर्णी
शापित कॅमेरा

## अर्पणपत्रिका

लहानपणी मी लवकर झोपावं म्हणून आई म्हणायची, “आता लवकर झोपला नाहीस ना तर बागुलबुवा येईल आणि तुला खाऊन टाकेल.” बागुलबुवाच्या भीतीने मी काही क्षणातच झोपी जायचो. घराघरातील तमाम लहानग्यांना भीतीची पहिली जाणीव करून देणाऱ्या  बागुलबुवास ही कथा अर्पण.

निरंजन कुलकर्णी

# उलट्या पायांची म्हातारी

# उलट्या पायांची म्हातारी

“ए विनू चल की लवकर. कवापासून थांबलोय!” सनीने पाचव्यांदा हाक दिली तसा विनू धावतच घराबाहेर आला. तसे सनी आणि नंदू झाडाआडून पुढं आले.

“खरंच जायचं का आपन? मला लय भ्या वाटतंय रे.” विनू घाबऱ्या नजरेने सनी आणि नंदूकडे पाहत म्हणाला.

हे ऐकून सनी आणि  नंदू मोठ्याने हसले. “तरी तुला म्हनत हुतो नको घ्यायला याला. लय भित्र हाय हे. सहावीत गेलंय पन अजूनी पहिलीतल्या पोरावानी चरडीत मुततंय” सनी नंदूकडे पाहून बोलला.

आपल्याला “भित्रा” बोललेलं विनूला आवडलं नाही. तो आवेशात येऊन म्हणाला, “मला भित्रा म्हंता व्हय. मी कुनाच्या बापाला बी भीत नाय. चला….” असे म्हणून तो एखाद्या योध्याच्या आवेशात पुढे आला.

तिघांनीही आपापल्या सायकलीवर टांग मारली व ते नदीच्या दिशेने निघाले.

रस्ता तसा मोकळाच होता. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या उंच झाडांच्या पानांच्या सळसळीचा आवाज सोडला तर सगळीकडे चिडीचूप शांतता होती. जोराचा वारा सुटला होता व आकाशात दाटलेले काळे कुट्ट ढग जणू आता पाऊस कोसळणार असल्याची पूर्वसूचनाच देत होते. सूर्य मावळतीला आला होता मात्र आकाशात साचलेल्या चिवट ढगांमुळे त्याचा कुठे मागमूसही

नव्हता. तिघेही आपापली सायकल वेगात दामटत होते. नेहमीप्रमाणेच सनी सर्वात पुढे होता, त्याच्या मागे नंदू व सर्वात शेवटी विनू होता. अजून बरंच अंतर बाकी होतं.

विनू पूर्ण जोर देऊन सायकलचे पॅडल फिरवत होता. पण त्याचे अशक्त पाय आता दुखू लागले होते. अचानक त्याच्या सायकल समोरून एक साप सळसळत गेला तसा विनूचा तोल जाऊन तो खाली कोसळला. "धप्प..." आवाज ऐकून सनी आणि नंदूने सायकल थांबवली व मागे वळून पाहिले. विनूला खाली पडलेला पाहून ते मागे आले व विनूला हात देऊन उभा केला. विनूला गुडघ्याला थोडं खरचटलं होतं पण फारसं लागलं नव्हतं.

"कसा काय पडला रे तू?" नंदूने विनूला विचारलं. समोरून साप गेल्याचं विनूने सांगितलं. अजूनही त्याच्या मनातील भीती तसूभरही कमी झाली नव्हती. सापाला पाहून तर तो अजूनच घाबरला होता. इथूनच मागे फिरावं असा विचारही त्याच्या मनात येऊन गेला पण ते आपल्याला पुन्हा भित्रा म्हणून चिडवतील हे लक्षात येताच तो सायकलवर स्वार झाला.

सनी, नंदू आणि विनू हे तिघेही अगदी लंगोटीयार होते. ते गावातल्या शाळेत सहावीच्या वर्गात शिकत होते. त्या तिघांच्यात विनू सर्वात हुशार होता. नंदू आणि सनी मात्र वर्गातील सर्वात उनाड मुलांपैकी होते. तरीदेखील त्या तिघांची अतिशय घट्ट मैत्री होती. नंदू आणि सनीला विनूला चिडवायला फार आवडायचं. विनूचा स्वभावच इतका गंभीर होता की कोणी चेष्टा केली तरी त्याला समजायचं नाही. पण सनी आणि नंदू सोडले तर विनूला इतर कोणी फारसे मित्र नव्हते. त्यांचं चिडवणंही आता त्याला सवयीचं झालं होतं. तो त्या दोघांना अभ्यासात मदतही करायचा. तर असे हे जीवश्च कंठश्च मित्र रविवारी गावभर भटकायचे. त्यांनी त्यांच्या लाडक्या बळवंत मास्तरांकडून उलट्या पायांच्या म्हातारीबद्दल ऐकलं होतं. गावाबाहेर नदीकाठी एका रिकाम्या जुनाट बंगल्यात तिचा आत्मा भटकतो असं मास्तरांनी त्यांना

सांगितलं होतं. तुमच्यात हिम्मत असेल तरच तिथे जा असंही मास्तरांनी त्यांना सांगितलं होतं. हे ऐकताच सनीने रविवारी तिथे जायचं ठरवलं. सुरुवातीला नंदू आणि विनू त्याच्या सोबत यायला तयार नव्हते. पण शेवटी सनीच्या आग्रहामुळे म्हणा किंवा हट्टामुळे ते दोघेही त्याच्या सोबत यायला तयार झाले.

थोडं पुढे जाताच त्यांना समोरून एक कार येताना दिसली. ती कार जवळ येताच सनीने ओळखलं. ती बळवंत मास्तरांची कार होती. सनी, नंदू आणि विनूला पाहताच बळवंत मास्तरांनी कार थांबवली व विचारलं, "कुठे चाललाय रे पोरांनो सांजच्याला?" तसा सनी म्हणाला, "मास्तर तुमीच सांगितलं व्हतं ना त्या उलट्या पायांच्या म्हातारीबद्दल, तीलाच बघाया चाललोय." "जावा जावा अन तिचे पाय उलटे आहेत की सरळ हे मला नंतर सांगा." बळवंत मास्तर हसत म्हणाले व तिथून निघाले.

बळवंत मास्तर हे मुलांना मास्तर कमी आणि मित्रच जास्त वाटायचे. ते कधीच मुलांवर ओरडायचे नाहीत. या अर्धवट वयातल्या मुलांना ओरडून, मारून काही उपयोग होणार नाही जरा त्यांच्या भाषेत सांगितलं की त्यांना समजतं असं बळवंत मास्तरांचं मत होतं. त्यामुळे ते सर्वच विद्यार्थ्यांचे लाडके मास्तर होते. शेवटच्या बेंचवर बसणाऱ्या उनाड मुलांसाठी तर ते एखाद्या हिरोपेक्षा कमी नव्हते. त्यांचा तो स्टायलिश गॉगल, मानेवरती रुळणारे लांब केस, लाल रंगाची चकचकीत कार सर्व काही एखाद्या हीरोसारखं होतं. ते शाळेत इंग्रजी विषय शिकवायचे. इंग्लिश तर असे फाडफाड बोलायचे की समोरचा पाहत रहायचा. शिकवता शिकवता मध्येच एखाद्या इंग्लिश मुव्हीतला डॉयलॉग बोलून दाखवायचे तोही अगदी त्या मुव्हीतल्या हिरोसारखा जसाच्या तसा. त्यांचं बोलणं, चालणं, वागणं शाळेतल्या इतर शिक्षकांना अजिबात आवडायचं नाही. आगरकर सरांनी तर मुख्याध्यापकांकडे तशी तक्रार देखील केली

होती. अशा छंदी फंदी शिक्षकामुळे मुलं बिघडतील, या अर्धवट वयातल्या मुलांवर नको त्या गोष्टींचा लगेच परिणाम होतो असं आगरकर सरांचं म्हणणं होतं. मुख्याध्यापकांनाही ते पटत होतं पण बळवंत मास्तर शिकवायला आल्यापासून शाळेतल्या मुलांचं इंग्रजी सुधारलंय हेही ते नाकारू शकत नव्हते. या एकाच कारणामुळे बळवंत मास्तर अजूनही शाळेत टिकून होते. बळवंत मास्तरांचं वय पस्तिशीच्या आसपास होतं मात्र अजूनही त्यांनी लग्न केलं नव्हतं. त्यांच्याबद्दल गावात अनेक गोष्टी बोलल्या जायच्या. तर असं हे गावातलं बहुरंगी व्यक्तिमत्व होतं.

सनी, नंदू आणि विनू एकदाचे नदीकिनाऱ्यावर पोहोचले. इतका वेळ सायकल चालवून तिघेही घामाघूम झाले होते. सूर्य आता पूर्ण मावळला होता. हवेतील दमटपणा अजूनच वाढला होता. तिघांनीही नदीच्या पाण्यात हात, पाय धुतले व चालतच तिघे बंगल्याच्या दिशेने निघाले. बंगला पूर्णपणे झाड-वेलींनी वेढला होता. आजूबाजूला साधं खोपटं देखील दिसत नव्हतं. नजर जाईल तिकडे चारी बाजूनी हिरवीगार झाडी दिसत होती. आजूबाजूला चिटपाखरूही नव्हतं. रातकिड्यांचा एकसुरी आवाज तेवढा येत होता बाकी सगळ काही शांत होतं.

समोरचा बंगला पाहून तर तिघेही पाहतच राहिले. एवढी भव्य वास्तू ते पहिल्यांदाच पाहात होते.

“कुनाचा असंल रे हा बंगला?” विनूने चष्म्याच्या कडांवरून पाहत विचारलं.

“काय म्हाइत? पन ज्येचा कोनाचा असंल तो लय मोठा मानुस असनार.” सनी म्हणाला.

यावर नंदूने पुढचा प्रश्न विचारला, “ती म्हातारी हितं खरंच असंल कारे?”

“तेच तर बघाया आपन आलोय.” सनी म्हणाला.

“चला रे.” असं म्हणून सनी बंगल्याच्या मुख्य दरवाजातून आत गेला. थोडा पुढे गेल्यावर त्याने मागे वळून पाहिले. नंदू आणि विनू अजूनही तिथेच दरवाजापाशी उभे होते, हे पाहून सनी म्हणाला, “चला की तिथं कशापायी थांबलाय.”

“म्हातारी खरंच असंल तर आत?” नंदू भीतभितच म्हणाला.

“अरं ती काय खाती व्हय तुमाला, अन नंदू या विनुच मी येकवेळ समजू शकतो. त्यो भित्राचाय. तू पण भ्यायलायस होयरे.” सनी हसत म्हणाला.

हे ऐकून चिडलेला विनू “मी काय कुनाच्या बापालाबी भीत नाय.” असं म्हणून तावातावाने पुढे गेला. नंदूदेखील नाईलाजाने पुढे गेला. आता तिघेही बंगल्याच्या पायऱ्या चढून मुख्य दरवाजासमोर उभे होते. दरवाजा अर्धवट उघडा होता. सनीने दरवाजाच्या फटीतून डोकावून पाहिले. खोलीत एक मंद कंदील अडकवला होता. त्या कंदिलाचा काय तो तेवढाच उजेड खोलीत होता. एका बाजूला खाट होती. समोर जुनाट सोफा होता. सोफ्याच्या बाजूला एक आराम खुर्ची होती. पण दार अर्धवट उघडं असल्यामुळे ती खुर्ची स्पष्ट दिसत नव्हती. अंगात होतं नव्हतं ते सगळं धाडस एकवटून सनीने दरवाजा आत ढकलला तसा गंजलेल्या बिजागिरांचा कर्रर्रर्रर्र.....आवाज झाला. सनीच्या पोटात भीतीने गोळा आला.

तो एकेक पाऊल हळुवारपणे टाकत खोलीत आला. त्याच्या पाठोपाठ नंदू आणि विनूनेही खोलीत प्रवेश केला. दोघांनी एकमेकांचा हात घट्ट पकडला होता. सनीने सोफ्याच्या बाजूच्या आरामखुर्चीकडे पाहिलं. खुर्चीवर एक वृध्द स्त्री बसली होती. तिचे डोळे मिटले होते. चेहेऱ्यावरच्या सुरकुत्या कंदिलाच्या मंद उजेडात अजूनच भयाण दिसत होत्या. तिच्या अंगावर पांघरूण होतं. पण त्यामुळे तिचे पाय काही दिसत नव्हते.

अचानक तिने डोळे उघडले व ढगांच्या गडगडाटासारखी हसली. तोंडात दात नव्हते. तिघांचीही आता चांगलीच टरकली होती. नंदू आणि विनूने एकमेकांच्या हातावरची पकड आणखीनच घट्ट केली. सनीही एक पाऊल मागे आला.

ते तिथून पळणार होते तितक्यात “माझे पाय उलटे आहेत का हे पाहायलाच आलात ना?” असे म्हणून म्हातारीने पांघरूण थोडं वर केलं तसे तिचे सुरकूतलेले अशक्त पाय दिसले. ते पाय सरळ होते उलटे नव्हते हे पाहून तिघांनीही किंचितसा निःश्वास सोडला. पण छातीतली धडधड काही कमी झाली नाही.

“घाबरू नका रे बाळांनो. कितीतरी वर्षांनी आज या बंगल्यात तुमच्यासारख्या मुलांचा पाय पडला.” असं म्हणून ती म्हातारी रडू लागली.

समोरचं दृश्य तिघांसाठीही अनपेक्षित होतं. सनीला तर त्याच्या आज्जीची आठवण झाली व त्या आठवणीने त्याचेदेखील डोळे पाणावले. आता बाहेरही पाऊस पडू लागला होता.

“तुम्हाला गोष्टी ऐकायला आवडतात का?” म्हातारीने प्रश्न केला

तसा तिघांनीही एका सुरात उत्तर दिलं “होssssss”

“घाबरणार नाही ना?” म्हातारीने पुन्हा प्रश्न केला.

यावर आधीच भ्यायलेला विनू काहीतरी बोलणार होता, इतक्यात सनीने त्याच्याकडे पाहिलं व त्याला नजरेनेच गप्प केलं.

“नाय भिनार आज्जी तुमी सांगा गोष्ट. पन येक ईचारु का?” सनी म्हणाला.

“विचार की?” असे म्हातारीने म्हणताच सनीने मनातील शंका विचारली,

“तुमी इथं एकट्या असता तर तुमचं जेवन खान वगरे कोन करतं?”

“मी एकटी नसते रे बाळा. माझा नातू आहे तो येत असतो अधूनमधून इथे. तोच सगळं काही पाहतो.” आज्जीने उत्तर दिलं व “आता ऐका” असे म्हणून गोष्टीला सुरुवात केली-

तर ही गोष्ट तुमच्यासारख्याच पण तुमच्यापेक्षा वयाने मोठ्या तीन मित्रांची आहे. दिनेश, पवन आणि योगेश हे तिघे मित्र एका गावात रहात होते. तिघेही तालुक्याच्या कॉलेजात वाणिज्य शाखेत शिक्षण घेत होते. दिनेश आणि योगेश दोघेही एकदम टगे होते तर पवन मात्र अगदी साधा सरळ मुलगा होता. पवन जरी हुशार असला तरी मुलखाचा भित्रा होता. त्याच्या भित्रेपणामुळे कॉलेजातील उनाड मुले त्याला चिडवायची त्रास द्यायची.

सुरवातीला दिनेश आणि योगेशदेखील पवनला फार छळायचे. बिचारा पवन अगदी रडकुंडीला यायचा. दिनेश आणि योगेश अभ्यासात तसे साधरणच. तरी योगेश त्यातल्यात्यात बरा होता. दिनेश कॉप्या करून कसाबसा पास व्हायचा. दिनेश फक्त त्याच्या  वडीलांनाच घाबरायचा. निकालाच्या दिवशी तर वडिलांच्या हातचा मार पक्का होता.

अशाच एका दिवशी गणिताच्या पेपरला दिनेश कॉपी घेऊन जायला विसरला. पण त्याचं नशीब चांगलं होतं कारण त्याच्या पुढच्याच बेंचवर पवन बसला होता. पवन त्याच्या नेहमीच्या सवयीने एका हातात पॅड तिरकं धरून लिहीत होता. दिनेश पवनशी बोलायला थोडा पुढे झुकला पण मास्तर आपल्याकडेच रोखून पाहतायत हे लक्षात येताच तो मागे गेला.

'आता आपलं काय खरं नाही. नापास झालो तर वडील चामडीच सोलतील' या विचाराने दिनेश अस्वस्थ झाला.

काही वेळाने वर्गात शिपाई आला व त्याने मास्तरांना अगदी हळू आवाजात काहीतरी सांगितलं. तसे मास्टर शिपायाला मोठ्याने म्हणाले, "मी येतोच. तोपर्यंत तू इथेच थांब आणि कोणी कॉपी करताना दिसला तर मला सांग. एकेकाचे गाल रंगवतो." असे म्हणून एकदा पूर्ण वर्गावर आपली धारदार नजर फिरवून मास्तर वर्गाबाहेर गेले.

मास्तर जाताच वर्गात कुजबुज सुरू झाली. “ए चष्मेश तुझा पेपर दाखव नाहीतर तुला माहितीये मी काय करेन.” असे दिनेशने धमकावताच पवनने त्याची उत्तरपत्रिका दिनेशकडे दिली. पेपर संपायला आता वीस मिनिटेच बाकी होती. तेव्हढ्या वेळात जेवढा जमेल तेवढी गणितं दिनेशने त्याच्या उत्तरपत्रिकेवर उतरवली. इतका वेळ शिपाई मोबाईलवर गेम खेळण्यात व्यस्त होता. शेवटची पाच मिनिटं बाकी असताना मास्तर वर्गात आले. त्यांना पाहताच शिपायाने गडबडीने मोबाईल खिशात घातला.

त्या दिवसापासून दिनेश आणि पवन चांगले मित्र झाले. पवन दिनेशचा मित्र झाल्यामुळे योगेशही त्याला आता काही बोलत नव्हता. वर्गातल्या कोणत्या मुलाने जर पवनची खोड काढली तर दिनेश त्याला बडवायचा. त्यामुळे आता पवनच्या नादाला कोण लागत नव्हतं.

आता पाहता पाहता कॉलेजचं शेवटचं वर्ष संपलं. दिनेश आणि योगेशने जोरदार पार्टी करायचं ठरवलं. तसं त्यांनी पवनला ही यायला सांगितलं.

‘मला वडील सोडणार नाहीत. तसंही मी काय पित नाही. तुम्ही मजा करा.’ असं नेहमीचं रडगाणं पवनने गाऊन दाखवलं.

“हे बघ. तू पि असं आम्ही म्हणत नाही. पण तुला आमच्या बरोबर यावेच लागेल.” असं जेव्हा दिनेशने दरडावल तेव्हा पवन नाईलाजाने पार्टीसाठी तयार झाला.

ठिकाण आणि दिवस ठरला. जवळच्याच एका डोंगरावर ते जाणार होते. तिथे टेकडीवरच एक रिसॉर्ट होते. ठरलेल्या वेळी तिघेही तिथे पोहोचले.

रात्रीची वेळ होती. अमावस्येची रात्र असल्यामुळे आकाशात तारे चमकत होते. सोसाट्याचा वारा सुटला होता. वातावरण आल्हाददायक होतं. जेवणाची ऑर्डर देऊन दिनेशने पिशवीतली बाटली बाहेर काढली व दोन ग्लास भरले. त्यात सोडा ओतून दिनेश आणि योगेशने ग्लास तोंडाला लावला. पवनचा ग्लास मात्र रिकामाच होता. तो नुसता त्या दोघांच्या तोंडाकडे

पाहात होता. मध्येच समोरच्या बशीतले शेंगदाणे तोंडात टाकत होता. आता ग्लास मधील दारू दोघांच्याही पोटात गेली होती. दिनेशने एकदा रिकाम्या ग्लासकडे पाहिले व ग्लास पुन्हा भरला. त्याने योगेशचाही ग्लास भरला व पवनच्या रिकाम्या ग्लासकडे पाहून तो म्हणाला, “ए पवन एकदा घेऊन तर बघ. आपल्या मैत्रिखातर घे.” असे म्हणून त्याने पवनच्याही ग्लासमध्ये थोडी दारू ओतली.

पवनने तरीही ग्लास उचलला नाही. हे पाहून दिनेश चिडला व पवनच्या अंगावर खेकसला, “घे म्हणतोय ना घे.” हे ऐकून पवन थोडा बिथरला व त्याने ग्लास हातात धरला.

आता दिनेश आणि योगेश पवनकडेच पाहात होते. शेवटी नाईलाजाने पवनने ग्लास तोंडाला लावला. एक घोट पोटात जाताच त्या कडवट चवीमुळे पवनला कसंसच झालं. त्याच्या चेहेऱ्याकडे पाहून दिनेश आणि योगेश जोरजोरात हसू लागले. पवनने तोंड वाकडं करून ग्लास परत टेबलवर ठेवला.

“का रे आवडली नाही का?” योगेशने खवचटपणे विचारलं तसं पवनने फक्त मान हलवली.

“तेवढा ग्लास संपव.” दिनेश पवनला म्हणाला.

“मला नाही आवडली चव.” पवन म्हणाला.

“दारूचा असा अपमान केलेला मला चालणार नाही. तुला तेवढा ग्लास संपवायलाच लागेल. संपव!” दिनेश पवनवर पुन्हा खेकसला.

आता त्याचा दुसरा ग्लास संपला होता. पवनने नाईलाजाने ग्लास पुन्हा ओठांना लावला व तोंड वाकडं करतच संपवला. दिनेश आणि योगेशचा आता तिसरा ग्लासही संपला होता. दारू त्यांच्या अंगात भिनली होती.

दिनेशने वेटरकडे जेवणाची चौकशी केली. पण जेवण तयार व्हायला अजून वेळ होता. त्यामुळे ते तिघेही खुर्चीवरून उठले व टेकडीच्या टोकाच्या दिशेने जाऊ लागले. दिनेश आणि योगेशच्या गप्पा चालू होत्या. पवनला मात्र ते काय बरळतायत तेच कळत नव्हतं. तो खाली दरीत पाहात उभा होता. त्यालाही थोडं गरगरल्यासारखं होत होतं. आता दोघांचेही आवाज वाढले होते. ते नक्की काय बोलतायत हे अजूनही पवनला समजत नव्हतं. आता तर ते चक्क एकमेकांशी भांडत होते. पवनला आता काळजी वाटत होती. त्याने योगेशच्या अंगावर धावून जाणाऱ्या दिनेशचा हात पकडला. हे पाहून आधीच चिडलेल्या दिनेशने पवनला हाताने धक्का मारला तसा पवनचा तोल जाऊन तो खाली दरीत पडला.

“धप्प......” असा मोठा आवाज झाला तसा वेटर धावत आला. वेटरच्या मागोमाग रिसॉर्टचा मालकही धावत आला. दिनेश आणि योगेशही आता चांगलेच भानावर आले होते. नक्की काय झालंय हे त्यांना समजलं होतं.

पवनच्या मृत्यूप्रकरणी न्यायालयाने दिनेशला पाच वर्षे तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. योगेशवरही या सगळ्या घटनेचा परिणाम झाला होता. या धक्क्यातून सावरायला बऱ्याच महिन्यांचा काळ जावा लागला.

आता मात्र योगेश पूर्णपणे सुधारला होता. त्याच्या वडिलांनी त्याला गावात एक दुकान उघडून दिलं होतं. काळ पटापट पुढे सरकत होता. पाच वर्षांचा तुरुंगवास भोगून दिनेश घरी आला होता. त्याला भेटायला योगेश त्याच्या घरी आला होता. दिनेशला पाहताच योगेशला तो दुर्दैवी प्रसंग आठवला व नुसत्या आठवणीनेच त्याच्या अंगावर काटा आला.

दिनेश पूर्णपणे बदलला होता. दाढी वेडीवाकडी वाढली होती. शरीर रोडावलं होतं. एखाद्या अट्टल गुन्हेगारासारखा निर्ढावलेपणा चेहऱ्यावर दिसत होता. तो योगेशला म्हणाला, “इतक्या वर्षात घशाची कोरड काही कमी झाली नाही. तुरुंगात जे मिळल त्यावर भागवावं लागलं. आता माझ्याकडे चांगला माल आलाय. उद्या मारुती मंदिराच्या मागे भेट.” दिनेशच्या

चेहेऱ्यावर पश्चात्तापाचा लवलेशसुद्धा दिसत नव्हता. योगेशला खरंतर इच्छा नव्हती पण इतक्या वर्षांनी भेटलेल्या मित्राला नाही म्हणता येईना.

दुसऱ्या दिवशी रात्री ठरलेल्या वेळी दोघेही मारुती मंदिरापाशी पोहोचले. मारुती मंदिर गावाच्या हद्दीलाच होतं. सकाळी तिथे भक्तांची गर्दी असायची तर रात्री दारुड्यांची. आजूबाजूला पूर्ण अंधार होता. रस्त्यावरचा दिवाही बंद होता. दिनेशने मंदिराच्या मागे मातीतच एक चटई पसरली. दोघेही चटईवर बसले. दिनेशने पिशवीतून दोन ग्लास काढून चटईवर ठेवले.

“च्यामायला त्या पवनच्या. त्या भिकारड्या भित्र्या चष्मेश पवनमुळे माझ्या आयुष्यातली पाच वर्षे वाया गेली.” योगेशकडे पाहून दिनेश म्हणाला. हे बोललेलं योगेशला आवडलं नाही. तो काहीच बोलला नाही हे पाहून दिनेशने पिशवीतून बाटली काढली. एकदा त्या बाटलीकडे जणू काही ती एखादी मौल्यवान वस्तू असल्याप्रमाणे कौतुकाने पाहिलं व बूच उघडून तो दारु ग्लासात ओतू लागला. दोन्ही ग्लासात दारू ओतल्यावर त्याने एक ग्लास योगेशच्या हातात दिला व एक ग्लास स्वतः उचलला. दोघांनीही आपापले ग्लास ओठांना लावले. तेवढ्यात अंधारातून आवाज आला- “माझाही ग्लास भर की!” व त्या पाठोपाठ अंधारातून एक रिकामा ग्लास पुढे आला आणि दिनेश व योगेशच्या किंकाळ्यानी आकाश दणाणलं.

“कशी वाटली गोष्ट. घाबरला नाही ना?” गोष्ट संपताच हसतच म्हातारीने विचारलं. “लयच भारी गोष्ट होती आज्जी. आवडली आपल्याला.” सनी म्हणाला. नंदू आणि विनू मात्र काहीच बोलले नाहीत. त्यांचा चेहराच काय ते सांगत होता.

“आता अजून एक गोष्ट ऐका.” आज्जी म्हणाली तसे तिघेही कान देऊन ऐकू लागले. आज्जीने गोष्टीला सुरुवात केली-

ही गोष्ट आहे साताऱ्यात राहणाऱ्या बबन म्हात्रेची. बबन लहानपणापासूनच फार धाडसी होता. मिलिटरीत जाऊन देशसेवा करायचं त्याचं स्वप्न होतं. पण त्याची उंची बेताचीच होती त्यामुळे त्याला मिलीटरीत प्रवेश मिळाला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोष्टी ऐकून वाचूनच तो मोठा झाला होता. त्याला शिक्षणात फारसा रस नव्हताच. मैदानी खेळात मात्र तो पटाईत होता. खोखो, कबड्डी आणि क्रिकेट हे त्याचे आवडते खेळ होते. शाळेत असताना तो ज्या कोणत्या टीमकडून खेळायचा त्या टीमचा विजय निश्चित असायचा. मग खेळ कोणताही असो.

पाहता पाहता बबनचं शालेय शिक्षण संपलं. कॉलेजातही त्याने कसंबसं पास होत बारावी पूर्ण केली. बारावी पास होताच मात्र त्याने शिक्षणाला राम राम ठोकला. बबनचा स्वभाव पाहता हा काय कुठे नोकरी करणार नाही हे त्याच्या घरच्यांना माहीत होतं. त्यामुळे लायसेन्स मिळताच वडिलांनी बबनला रिक्षा घेऊन दिली.

बबनला फिरायचीही खूप आवड होती. आज या गडावर तर उद्या त्या गडावर अशी त्याची भटकंती सुरूच असायची. त्याच्यासारख्या मुसाफिरांसाठी तर साताऱ्यासारखं डोंगर दऱ्यांनी वेढलेलं निसर्गाच्या कलाकुसरीने नटलेलं ठिकाण म्हणजे पर्वणीच होती. बबन कुठेही गेला तरी त्याच्या लाडक्या रिक्षानेच जात असे. रिक्षा कामासाठी कमी आणि फिरायसाठीच जास्त वापरतो म्हणून बबनचे वडील त्याला रागवायचे. पण त्यांच्या रागवण्याचा त्याच्यावर फारसा परिणाम होत नव्हता. त्याची भटकंती सुरूच होती.

बबनने आता वयाची पंचविशी ओलांडली होती. त्याच्या वागण्यात मात्र अजूनही काहीच बदल नव्हता. तशी घरची गडगंज शेती होती त्यामुळे कमाईची फारशी चिंता नव्हती. पण

आता लग्नाचं वय झालं होतं. या अशा अल्लड मुलाला मुलगी कोण देणार हीच चिंता बबनच्या घरच्यांना वाटत होती.

सध्या बबनला एक वेगळाच नाद लागला होता. तेच तेच गडकिल्ले चढून उतरून तो आता कंटाळला होता. जिल्ह्यात ज्या ज्या ठिकाणी लोकांना भुताटकीचे अनुभव आले होते तिथे तो एकटा जाऊन रात्री मुक्काम ठोकायचा. बबनला भीती वाटत नव्हती असंही नव्हतं. पण त्या भीतीवर मात केल्याचा एक वेगळाच आनंद त्याला व्हायचा. तसंही आतापर्यंत अशा कितीतरी जागांवर तो राहून आला होता. पण एकदोन जागा सोडल्या तर त्याला भीतीदायक अनुभव आला नव्हता. ज्या जागांवर त्याला तसा अनुभव आला होता तिथेही मनातील भीतीमुळे आपल्याला भास झाला असेल असा त्याचा समज झाला होता.

अशाच एका ठिकाणी आज बबन निघाला होता. जवळच्याच एका गावातल्या विहिरीतल्या हडळीबद्दल त्याने ऐकलं होतं. त्या हडळीबद्दल एक आख्यायिका गावात प्रचलित होती. फार वर्षांपूर्वी त्या गावात एक वेडी बाई रहात होती. गावातील उनाड मुलं त्या बाईला फार त्रास द्यायची. कधी तिला वेडी वेडी म्हणून चिडवायची तर कधी झाडाआड लपून तिच्या अंगावर दगड मारायची. या मुलांच्या त्रासाला कंटाळून त्या वेड्या बाईने एका रात्री विहिरीत उडी मारून आत्महत्या केली होती. अमावस्येच्या रात्री जर कोण विहिरीजवळ गेलं तर ती विहिरीतून वर येऊन त्याला विहीरीत ओढून नेते अशी गावातील लोकांची समजूत होती. तसेच इतक्या वर्षात गावातील पाच मुलांचा विहिरीत पडून मृत्य झाला होता तो ही अमावस्येच्या रात्री. त्यातील दोघे तर पट्टीचे पोहोणारे होते.

बबन रात्री गावात पोहोचला. त्याचा एक मित्र त्या गावात रहात होता. रात्री बबन मित्राकडेच जेवला. मित्राने व त्याच्या घरच्यांनी बबनला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. पण बबन मागे हटणार नव्हता.

रात्री बारा वाजता बबन एकटाच विहिरीकडे गेला. त्याने एकवार आकाशातल्या चमकणाऱ्या ताऱ्यांकडे पाहिले व तो विहिरीच्या कठड्यापाशी गेला. विहिरीच्या कठड्यावर बसून त्याने डोकावून पाहिले. विहिरीतलं हिरवंगार पाणी चांदण्यांच्या उजेडात चमकत होतं. बबनने एक मोठा दगड उचलला व विहिरीत फेकला. दगड विहिरीतल्या पाण्यात पडताच पाणी उंच उडालं व पाण्यावर उठलेले तरंग रुंद होत पाणी पुन्हा स्थिर झालं.

बबन बराच वेळ तिथे बसून होता. इतका वेळ झाला तरी काहीच हालचाल नाही हे पाहून तो आता कंटाळला होता. शेवटी कंटाळून त्याने एका मित्राला फोन लावला व त्यांच्या गप्पा चालू झाल्या. बराच वेळ त्यांच्या गप्पा सुरु होत्या. “लय बोर होतंय रे. या येळेस बी फुसका बार निघाला.” असं बबन त्याच्या मित्राला सांगत होता तेवढ्यात, “डुबुकsssss” असा आवाज झाला व त्या आवाजाने बबन दचकून थोडा मागे सरकला. मित्राचा फोन तसाच चालू होता. बबनचं मात्र तिकडे लक्ष नव्हतं. त्याच्या हृदयाची धडधड अजूनही कमी झाली नव्हती.

थोडया वेळाने अंगातलं सारं धाडस एकवटून बबन पुन्हा विहिरीच्या कठड्याजवळ गेला व त्याने हळूच वाकून पाहिलं. विहिरीत कसलीच हालचाल नव्हती. पाणी स्थिर होतं. बबनने आवंढा गिळला. आपल्याला भास झाला असावा अशी स्वतःची समजून काढुन तो विहिरीत डोकावून पाहात बसला.

बराच वेळ झाला तरी काहीच हालचाल नाही हे पाहून बबनचं धाडस अजून वाढलं. तो विहिरीत डोकावून पाहात बोलला, “ए वेडे तुला भेटाया आलोय. तोंड तर दाखिव तुझं. हिम्मत असंल तर या मर्दाला ओढून ने तुझ्या विहिरीत.”

समोरून काहीच प्रतिसाद आला नाही तसा बबनने अजून एक दगड उचलून विहिरीत टाकला. अजूनही सगळं शांत होतं. शेवटी बबन वैतागून तिथेच झोपला.

कोंबडा अरवला तशी बबनला जाग आली. निराश मनानेच त्याने मित्राचा निरोप घेलता व घरी परतला. रात्री नेहमीप्रमाणे बबन कट्ट्यावर गेला. तिथे गल्लीतली रिकामटेकडी पोरं चकाट्यापिटत बसली होती. तो त्याच्या मित्रांना म्हणाला, "मला तर आता असं वाटाया लागलय की भूत बीत सगळं खोटाय."

हे ऐकून एक मित्र म्हणाला, "तुझ्यात जर खरंच हिम्मत असेल तर कासच्या डाक बंगल्यावर एकटा रात्री राहून दाखव. माझा एक मित्र तिथे रात्री गेला होता तो परत कधी दिसलाच नाही."

"त्यात काय येवड. आपनच कितीतरी वेळा गेलोय की तिकडं. आता तू म्हनतोय तर येकटा जाऊन दाखवतो तेही अमावसेच्या रातीला." बबन बेफिकिरपणे म्हणाला.

हे ऐकून सगळेच शहारले. एकदोन मित्रांनीतर त्याला समजावण्याचाही प्रयत्न केला. पण आता तोंडून शब्द गेला होता. आता बबन माघार घेऊ शकत नव्हता आणि तो घेणारही नव्हता.

पुढच्याच अमावस्येला रात्री बबन रिक्षा घेऊन कास तलावाच्या दिशेने निघाला. रात्री दहाच्या सुमारास बबन डाक बंगल्यावर पोहोचला. हा बंगला चांगलाच बदनाम होता. अनेक लोकांनी या बंगल्यात आत्महत्या केली होती. तसेच इथे खुनही पडले होते. एरवी हा बंगला दारुड्यांचा अड्डा असायचा पण अमावस्येच्या रात्री मात्र इथे कोण फिरकत नसे. एकट्याने यायचा तर कोणी विचारदेखील केला नसता. अशा ठिकाणी बबन मुक्काम ठोकणार होता.

बंगल्यात पोहोचताच बबनने पिशवीतून डबा काढला व जेवण आटोपलं. जेवण झाल्यावर त्याने पूर्ण बंगल्यात एक फेरी मारली. बंगल्यात एकूण चार खोल्या होत्या. सगळ्या खोल्यात

धुळीचं साम्राज्य होतं. तसेच सगळीकडे दारूच्या रिकाम्या बाटल्या पडलेल्या होत्या. बबन शेवटच्या खोलीत आला. त्याने खिडकीतून पाहिले. समोर तलाव दिसत होता.

बबन डाक बंगल्यातून बाहेर आला व चालतच तलावपाशी गेला. आजूबाजूला गर्द झाडी होती. रातकिड्यांचा ओरडणं कानावर येत होतं. या वेळी पाऊस चांगला झाल्यामुळे तलावाच्या पाण्याची पातळी वाढली होती. बबनने तलावाच्या पाण्यातच पाय धुतले व तो पुन्हा बंगल्यात आला. त्याने शेवटच्या खोलीत सतरंजी अंथरली व त्यावर आडवा झाला. बराच वेळ तो पडून होता.

अचानक लांबून कुठूनतरी कोल्ह्याच्या रडण्याचा अभद्र आवाज बबनला ऐकू आला. तसा बबन उठला व त्याने खिडकीतून बाहेर पाहिलं. बाहेर पाहताच त्याच्या हृदयाची धडधड वाढली. समोर तलावाजवळ एक पांढरी आकृती उभी होती व बबनने तिच्याकडे पाहताच ती अतिशय संथ गतीने बंगल्याच्या दिशेने सरकू लागली. हे पाहून बबनला धडकी भरली. पहिल्यांदाच तो घाबरला होता. त्याने खोलीच्या दाराला आतून कडी लावली व सतरंजीवर अंग पसरलं. खिडकीतून बाहेर पाहण्याची त्याची आता हिम्मत होत नव्हती. तो बराच वेळ तसाच पडून राहिला. अजूनही मनात भीती होतीच पण तितकंच कुतूहल ही वाटत होतं. शेवटी न राहवून बबन उठला व त्याने हळूच खिडकीतून बाहेर पाहिलं. ती आकृती आता कुठेच दिसत नव्हती. नेहमीप्रमाणेच आपल्याला भास झाला अशी स्वतःची समजूत काढून बबनने पुन्हा अंग पसरलं. मध्यरात्रीच केव्हातरी त्याला गाढ झोप लागली.

पहाट झाली तसा सगळीकडे पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला. हिवाळ्याचे दिवस असल्यामुळे हवेत चांगलाच गारठा होता. तलावावरून वाहणाऱ्या गार वाऱ्यामुळे बबन कुडकूडतच जागा झाला. रात्री दिसलेली ती पांढरी आकृती सोडली तर भयानक असं काहीच घडलं नव्हतं. त्याने मित्राला फोन लावून त्या आकृतीबद्दल सांगितलं व तलावाच्या पाण्याने हात पाय तोंड धुवून तो परत जायला निघाला.

आजूबाजूचं निसर्ग सौंदर्य पाहात बबन निवांतपणे रिक्षा पळवत होता. ती पांढरी आकृती काहिकेल्या त्याच्या मनातून जात नव्हती. सूर्य अजून उगवायचा होता. त्यामुळे अजूनही अंधार होता. रस्त्याच्या दुतर्फा हिरवळ होती त्यामुळे हवेतला गारवा आता जास्तच जाणवत होता. रस्ता पूर्ण मोकळा होता.

आता निम्मं अंतर संपलं होतं. पुढे वळणावर एक बाई उभी असलेली त्याला दिसली. एवढी सुंदर बाई बबनने याआधी पाहिलीच नव्हती.

“कुठे जायचय.” त्या बाईसमोर रिक्षा थांबवून बबनने विचारलं.

“येवतेश्वरला सोडाल का?” बाईने अतिशय गोड नाजूक आवाजात विचारलं.

“सोडतो की! बसा.” अतिशय खुश होऊन बबन म्हणाला. बाई रिक्षात बसली.

“येवढ्या पहाटेच कुठं गेलता बाई?” बबनने विचारलं. “म्या सुईन हाय. गावातल्या पाटलाची पोरगी अडलीवती म्हून गेलेवते.” बाई म्हणाली.

“मग काय झालं पोरगा की पोरगी?” आरशात दिसणाऱ्या सुंदर चेहेऱ्याकडे पाहात बबनने विचारलं.

“पोरगी.” बाई एवढंच म्हणाली.

“तुमी सुईन वाटत नाय हो.” बबन म्हणाला तसा आरस्यातला चेहरा हसला. “बाहेर येवढा गारठा हाय तुमाला थंडी नाय वाजत का?” बबनने चावटपणे विचारलं व आरस्यात पाहिलं पण बाईचा चेहेरा आता दिसत नव्हता.

बबनने मागे वळून पाहताच त्याला घाम फुटला. मागची सीट रिकामी होती. आता मात्र बबनची चांगलीच टरकली. त्याने रिक्षाचा वेग वाढवला. थोडं पुढे गेल्यावर वळणावर एक आकृती त्याला दिसली. जवळ जाताच त्याने ओळखलं ती बाईच तिथे उभी होती. पण आता

ती जख्ख म्हातारी दिसत होती. तिचे पांढरे केस वाऱ्यावर उडत होते. बबनची रिक्षा तिच्या समोरून जाताच ती रिक्षाच्या बाजूने धावू लागली. बराच वेळ ती रिक्षाच्या बाजूने धावत होती. बबन जिवाच्या आकांताने शक्य तितक्या जास्त वेगात रिक्षा पळवत होता. बाजूला पाहायचंही त्याला धाडस होत नव्हतं. येवतेश्वरची हद्द ओलांडताच ती थांबली. बबन मात्र अजूनही बाजूला पाहायला तयार नव्हता. कशी बशी त्याने रिक्षा घरासमोर आणली आणि तो दारातच कोसळला. त्याच दिवशी त्याला ताप चढला. बऱ्याच दिवसानंतर बबनचा ताप उतरला. पण अंगातली रग आता गेली होती व भटकंतीही कायमची थांबली.

म्हातारीने गोष्ट संपवली.

“लयच भारी गोष्ट सांगता हो तुमी आज्जी. माझी आज्जी पन मला अशाच भुताच्या गोष्टी सांगायची. लय भ्या वाटायची मला तवा. पन आता मी नाय घाबरत.” सनी म्हणाला.

ही गोष्ट ऐकून तर नंदू आणि विनूची दातखिळीच बसली होती. भीतीतर वाटत होती पण तसं बोललो तर आपल्याला बाकीचे दोघे भित्रा म्हणतील या भीतीने दोघेही काहीच बोलत नव्हते.

सनी मात्र आता चांगलाच रंगात आला होता. “आज्जी अजून एक गोष्ट सांगा ना.” असं म्हणत त्याने नंदू आणि विनूची आणखीनच पंचाईत केली.

तो असं बोलायची जणू वाटच पाहात असल्यासारखं म्हातारी म्हणाली, “सांगते पण आधी एकेक कप गरमगरम दूध प्या. थंडीमुळे गारठले असाल. इथेच थांबा मी दूध घेऊन येते.” असे म्हणून म्हातारी उठली व काठीचा आधार घेत हळू हळू चालत स्वयंपाकघरात गेली.

म्हातारी जाताच विनू उठला व सनीपाशी जाऊन म्हणाला, "सनी आपन निघायचं का हितुन? मला लय भ्या वाटायलय. ही म्हातारी काय बरी वाटत नाय."

"काय बी बोलू नगस. मला तर या आज्जीला पाहून माझ्या आज्जीची आठवन आली. अन तुला भ्या वाटत असंल तर तू जा. मी हितच थांबनारे." सनी चिडून म्हणाला.

विनूने एकदा दाराच्या बाहेर पाहिले व धो धो कोसळणारा पाऊस पाहून नाईलाजाने तिथेच थांबायचं ठरवलं.

थोड्या वेळाने म्हातारी बाहेर आली व म्हणाली, "जरा कोणीतरी येऊन कप घेऊन जावा." तसा सनी उठला व स्वयंपाकघरातील टेबलवर ठेवलेला ट्रे घेऊन बाहेर आला. म्हातारीही काठी टेकत आली व तिच्या खुर्चीवर बसली. तिघांनाही जोरदार भूक लागली होती. तिघांनी दोनच मिनिटात कप रिकामे केले.

"तुम्हाला घरी जायचं नाही का रे बाळांनो." दुध पिऊन होताच म्हातारीने विचारलं.

"नाही आमी घरी सांगूनच आलोय की आज रातच्याला येनार नाही." सनी म्हणाला.

खरंतर विनूच्या घरचे परगावी गेले होते व सनी आणि नंदूने आम्ही आज रात्री विनूकडेच झोपणार आहे असं घरी सांगितलं होतं.

"बरं. आता पुढची गोष्ट ऐका" असे म्हणून म्हातारीने तिसरी गोष्ट सांगायला सुरुवात केली.



# उलट्या पायांची म्हातारी

गोष्ट ऐकत असताना काही वेळातच तिघांनाही अचानक गुंगी आली व काही क्षणातच त्यांना निद्रादेवी प्रसन्न झाली. झोपी गेलेल्या मुलांकडे पाहून म्हातारी ओठांच्या कडा रुंदावून हसली व तिने गोष्ट तिथेच थांबवली.

काही वेळातच एक माणूस दारातून आत आला व म्हातारीजवळ जाऊन काहीतरी म्हणाला. त्याने एकेक करत तिघांनाही ओढत स्वयंपाकघराच्या बाजूच्या खोलीत आणलं. त्या खोलीत तीन खुर्च्या ठेवल्या होत्या. त्या माणसाने तिघांनाही एकेका खुर्चीवर बसवलं व त्यांचे हात पाय खुर्चीला बांधले. एक कापडाची पट्टी तोंडाभोवती बांधून त्यांची तोंडही बंद केली. खोलीच्या दुसऱ्या टोकाला एक मोठा दगड ठेवला होता. तो दगड काळ्या रंगाने रंगवला होता व त्यावर लाल रंगाने डोळे आणि ओठ रंगवले होते. कंदीलाच्या उजेडात तो दगड फारच भयानक दिसत होता.

सनी, नंदू आणि विनूला जेव्हा जाग आली तेव्हा समोर उभ्या असलेल्या माणसाकडे पाहून धक्का बसला. त्यांच्या समोर त्यांचे लाडके बळवंत मास्तर उभे होते. त्या तिघांचेही हात पाय तोंड बांधले असल्यामुळे त्यांना काहीच हालचाल करता येत नव्हती. तिघेही समोर उभ्या बळवंत मास्तरांकडे आश्चर्याने पाहात होते. पण बळवंत मास्तर नेहमी सारखे वाटत नव्हते. त्यांच्या चेहेऱ्यावर एक वेगळाच असुरी आनंद दिसत होता. “तुम्ही म्हातारीच्या गोष्टी ऐकल्याच असतील. आता मीही तुम्हाला एक गोष्ट सांगणार आहे. नीट लक्ष देऊन ऐका.” असे म्हणून मास्तरांनी गोष्टीला सुरुवात केली-

ही गोष्ट गुब्बू नावाच्या एका मुलाची आहे. गुब्बू अगदी लहान असल्यापासून फारच गुबगुबीत होता म्हणून त्याला सगळे गुब्बू म्हणायचे. गुब्बूचा जन्म इथून खूप दूर एका छोट्याश्या गावात झाला होता. त्याचे वडील डॉक्टर होते.

गुब्बू अगदी लहान असतानाच त्याची आई वारली. घरात गुब्बू , त्याचे वडील आणि आज्जी असे तिघेच रहात होते.

गुब्बू पहिल्यापासूनच आभ्यासात फार हुशार होता. वडिलांसारखं डॉक्टर बनायचं त्याचं स्वप्न होतं. शाळेत असताना त्याला मित्र फारसे नव्हतेच. त्याच्या जाडीमूळे मुलं त्याला फार चिडवायची. त्यामुळे गुब्बू जास्तच एकलकोंडा झाला होता. गुब्बूला वाचनाची आवड होती. त्यातही इंग्रजी कथा कादंबऱ्या वाचायला त्याला फार आवडायचं. एखादं पुस्तक त्याला आवडलं तर ते वाचून पूर्ण होईपर्यंत तो जागचा हलत नसे. गुब्बू आज्जीचा फार लाडका होता. ती त्याला भुताखेताच्या गोष्टी सांगायची. आज्जीच्या कथेतील भुतांनी गुब्बूला कितीतरी रात्री झोपून दिलं नव्हतं. पण तरीही त्याला आज्जीच्या गोष्टी आवडायच्या.

तर अशा या साध्या सरळ गुब्बूच्या आयुष्यात अशी एक घटना घडली ज्यामुळे त्याचं आयुष्यच बदललं. तेव्हा तो आठवीच्या वर्गात शिकत होता. शनिवारचा दिवस होता. शेवटचा तास पिटीचा होता. सगळी मुलं शाळेच्या मैदानावर जमली होती. मास्तर मुलांना कवायतीचे वेगवेगळे प्रकार करून दाखवत होते व त्यांचं पाहून मुले कवायत करत होती.

गुब्बूही कवायत करत होता. त्याचं हलणार थुलथूलीत शरीर पाहून त्याच्या मागे उभी असलेली काही टारगट मुलं हसत होती. मास्तरांनी त्या मुलांना हसताना पाहिलं तसे ते हातात काठी घेऊन गेले व एकेकाच्या पोटऱ्या आणि पाठीवर काठीचा प्रसाद दिला. त्या मारामुळे ती मुलं चांगलीच कळवळली.

पिटीचा तास संपला तशी सर्व मुलं पांगली. गुब्बूही मैदानावरून जात होता. ती टारगट मुलंदेखील गुब्बूच्या मागून चालत होती. एका मुलाने जो त्यांचा म्होरक्या होता त्याने म्हणजेच सतिशने मैदानावरचा एक दगड उचलला व गुब्बूच्या पाठीवर मारला तसा गुब्बू कळवळला. त्याने मागे वळून पाहिले, ती टारगट मुलं त्याच्याकडे बघून हसत होती.

त्यांना पाहताच गुब्बूने चालण्याचा वेग वाढवला. तो घाबरला होता. आता सतीशने धावत जाऊन गुब्बूच्या डाव्या पायावर एक जोरदार लाथ मारली तसं गुब्बूचं अवजड शरीर खाली मातीत कोसळलं. त्याचा पाय चांगलाच ठणकत होता. सगळी मुलं गुब्बूच्या भोवती जमली व त्याच्याकडे पाहून हसू लागली. गुब्बू आता रडकुंडीला आला होता. सतीशचं लक्ष गुब्बूच्या डाव्या मनगटावर अडकवलेल्या सोनेरी घड्याळाकडे गेलं. त्याने गुब्बूच्या मनगटावरचं घड्याळ काढलं व गुब्बूला दाखवत तो म्हणाला, "आता हे घड्याळ माझं." असं म्हणून तो त्याच्या मित्रांना म्हणाला, "चला रे. या जाड्याला पडुदे इथंच." टारगट मुलं तिथून पळाली तसा गुब्बू उठला.

त्याच्या डोळ्यात अश्रू होते चेहऱ्यावर संताप होता.

गुब्बू घरी पोहोचला.

"काय रे गुब्बू कुणाशी भांडण झालं का?" त्याचा पडलेला चेहरा व मळलेले कपडे पाहून आज्जीने विचारलं.

गुब्बूने रडतच घडलेला प्रकार सांगितला. आपल्या लाडक्या नातवाची ही अवस्था पाहून आज्जीला फार वाईट वाटलं.

"माझ्या सोबत ये." असे आज्जी गुब्बूला म्हणाली व जिना चढून वरच्या मजल्यावर गेली. गुब्बूही जिना चढून तिच्या मागे गेला. समोरच्या खोलीला कुलूप होतं. या खोलीत आज्जी कुणालाच येऊन देत नसे. गुब्बूच्या वडिलांनाही या खोलीत प्रवेश नव्हता. आजीने हातातल्या

चावीने कुलूप उघडलं व दरवाजा ढकलला. आतून अतिशय उग्र वास आला. आज्जी खोलीत गेली, तिच्या पाठोपाठ गुब्बूनेही खोलीत प्रवेश केला.

आज्जीने ट्यूबलाईटचं बटन दाबताच खोलीत लख्ख प्रकाश पडला. खोली छोटीशीच होती. खोलीत एका कोपऱ्यात बरीच जुनी पुस्तकं ठेवली होती. समोर एक जुनाट कपाट होतं तिथे वेगवेगळ्या आकाराच्या भावल्या ठेवल्या होत्या. जमिनीवर वेगवेगळ्या आकाराच्या विचित्र आकृती होत्या. त्या सर्व आकृती भाजलेल्या काळ्या तांदळाच्या दाण्यांपासून बनवल्या होत्या. एका कोपऱ्यात वेगवेगळ्या आकाराची हाडे व कवट्या ठेवल्या होत्या. त्यांच्या बाजूला एक मोठा दगड ठेवला होता. तो दगड काळ्या रंगाने रंगवला होता व त्यावर लाल रंगाने डोळे व ओठ रंगवले होते. कपाटात खालच्या कप्प्यात काचेच्या रिकाम्या बरण्या ठेवल्या होत्या. गुब्बू आवासून पाहात होता. चेटकिणीच्या अनेक कथा त्याने आज्जीच्या तोंडून ऐकल्या होत्या पण आज्जी स्वतःच चेटकीण आहे याची त्याला यापूर्वी तिळमात्रही कल्पना नव्हती.

खोलीतून बाहेर येताच आज्जीने आजूबाजूला पाहीलं व खोलीला कुलूप लावलं. आज्जी गुब्बूकडे पाहून म्हणाली, “तू आज जे काही पाहिलस ते कुणालाही सांगायचं नाही. अगदी तुझ्या बाबांनाही नाही सांगायचं.”

“तुला सतिशला धडा शिकवायचा आहे ना? मग मी सांगेल ते करायचं. करशील?” आज्जीने विचारलं. गुब्बूने मान हलवली.

आज्जी पुढे सांगू लागली, “काहीही करून मला त्या सतिशचे केस आणून दे. एक केस पण चालेल. मग बघ मी काय करते.” आज्जी क्रूरपणे हसत म्हणाली.

गुब्बूच्या डोक्यात एकच विचार घोळत होता. आज्जीने सतिशचे केस आणायला सांगितलंय पण हे कसं शक्य आहे. आधीच मला त्या सतिशची भीती वाटते. पण काहीतरी करायलाच हवं. असा बराच वेळ विचार केल्यावर त्याला एक कल्पना सुचली.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे गुब्बू शाळेत गेला. त्याने सतिशकडे पाहिलं. गुब्बूला त्याचं सोनेरी घड्याळ सतिशच्या मनगटावर दिसलं. ते घड्याळ गुब्बूला त्याच्या बाबांनी वाढदिवसाला भेट दिलं होतं. गुब्बूने त्याच्या ठरलेल्या योजनेची मनात उजळणी केली व तो शाळा सुटायची वाट पाहू लागला.

एकदाची शाळा सुटल्याची घंटा वाजली. एकेक करत मुलं वर्गातून बाहेर पडत होती. गुब्बूचं लक्ष सतिशकडे होतं. सतिशचा कंपू वर्गाच्या बाहेर आला व मैदानाच्या दिशेने चालू लागला. गुब्बूही त्यांच्या मागून जाऊ लागला.

आता सतिशचा कंपू मैदानावर आला. त्यांच्यापासून थोड्या अंतरावर गुब्बू उभा होता. तो अजूनही सतिशकडेच पाहात होता. सतिशचं लक्ष गुब्बूकडे जाताच तो म्हणाला, “काय रे ढोल्या कालचा मार कमी पडला म्हणून आज परत मार खायला आलायस?” व सगळे हसले. गुब्बू काहीच बोलला नाही. तो धावतच सतिशजवळ गेला व सतिशला काही कळायच्या आतच त्याने सतिशचे केस पकडले. गुब्बूने पूर्ण जोर देऊन सतिशचे केस ओढले तसा सतिश “आई ग.......” असा ओरडला.

गुब्बूने हाताची पकड अजूनच घट्ट केली तसा सतिश अजून जोरात ओरडू लागला. सतिशला सोडवायला त्याचे मित्र धावून आले व त्यांनी गुब्बूवर लाथाबुक्यांचा वर्षाव केला. एकदाची गुब्बूची मूठ सैल झाली तेव्हा कुठे सतिशने सुटकेचा निःश्वास टाकला. बराच वेळ लाथाबुक्यांचा प्रसाद दिल्यावर ती मुलं तिथून निघून गेली. सतिशही डोकं चोळत त्यांच्या मागे चालू लागला.

आज एवढा मार खाऊन देखील गुब्बू रडला नाही. मुलं निघून जाताच त्याने हाताची मूठ उघडली व हातातल्या केसांकडे पाहून तो समाधानाने हसला.

घरी जाताच गुब्बूने हातातले केस आज्जीकडे दिले. आज्जीने गुब्बूचेही थोडे केस कात्रीने कापले व ते घेऊन ती वरच्या खोलीत गेली. बऱ्याच वेळाने आज्जी खाली आली व गुब्बूला

म्हणाली, “बाळ आता काही काळजी करू नकोस. उद्या शाळेत गेलास की तो सतिश समोर दिसताच त्याच्या समोर उभा राहून फक्त एकदा चुटकी वाजव. मग बघा तो कसा पळतो ते.”

दुसऱ्या दिवशी शाळा सुटतात गुब्बू सतिशच्या मागे गेला. मैदानावर पोहोचताच त्याने सतिशला हाक मारली. सतिशने मागे वळून पाहिले. समोर गुब्बूला पाहताच त्याचा पारा चढला व तो धावतच गुब्बूच्या दिशेने जाऊ लागला. तो जवळ येताच गुब्बूने चुटकी वाजवली तसा सतिश जागीच थबकला. त्याला गुब्बूच्या बाजूला एक काळी आकृती दिसत होती. त्या आकृतीचा आकार माणसासारखाच होता पण ती हवेत तरंगत होती. आता ती आकृती सतिशच्या दिशेने सरकू लागली. हे पाहताच सतिश धावत सुटला.

त्याच्या मित्रांना मात्र काहीच समजत नव्हतं.

अखेर गुब्बू विजयी झाला होता. आता त्याला चिडवण्याचं, मारण्याचं धाडस कोण करणार नव्हता. पुढचे कित्येक दिवस सतिशला गुब्बूकडे पाहायचसुद्धा धाडस झालं नाही.

दिवस पटापटा पळत होते. गुब्बू दहावी उत्तीर्ण झाला. आज्जीच्या हाताखाली तो तंत्रविद्येत पारंगत झाला होता.

आता दहावीनंतर पुढे काय हा प्रश्न होता. यावरून वडील आणि मुलात बराच वाद झाला. आपला मुलगा डॉक्टर व्हावा अशी गुब्बूच्या बाबांची इच्छा होती लहान असताना त्यालाही तसं वाटायचं. पण वय वाढलं तशा आवडीनिवडी बदलत गेल्या. इंग्रजी पुस्तकं वाचता वाचता गुब्बूच्या मनात इंग्रजी भाषेविषयी गोडी निर्माण झाली होती. त्याला बी.ए करून नंतर एम. ए करायचं होतं. शेवटी वडिलांच्या हट्टाला न जुमानता त्याने अकरावीला कला शाखेत प्रवेश घेतला. कॉलेजात गेल्यापासून गुब्बूला त्याच्या स्थूल शरीराचा जास्तच राग येऊ लागला होता. सडपातळ किंवा बळकट शरीर असलेल्या मुलांशीच मुली जास्त बोलतात हे तो पाहात होता. आता त्याने व्यायाम करायला सुरुवात केली व काही महिन्यातच त्याला स्वतःतला बदल जाणवू लागला. त्याचा आत्मविश्वासही आता वाढला होता.

सगळं चांगलं चाललं असताना गुब्बूच्या वडिलांची तब्येत अचानक बिघडली. त्यांना टीबी झाला होता. दिवसेंदिवस त्यांची तब्येत खालावत चालली होती आणि जवळजवळ तीन महिने सुरू असलेली ही झुंज अखेर संपली. टीबी जिंकला होता वडील हरले होते. आता घरात गुब्बू आणि आज्जी दोघेच राहिले.

बारावी, बारावी नंतर बी.ए, बी.ए झाल्यावर एम.ए असं एकदाचं गुब्बूचं शिक्षण संपलं. आज्जीही आता थकली होती. गुब्बूला तालुक्याच्या कॉलेजातून प्राध्यापकाच्या नोकरीसाठी बोलावणं  आलं होतं. त्यालाही ही संधी सोडायची नव्हती. पण आज्जीची गाव सोडायची इच्छा नव्हती. तसेच तिची तब्येतही आता फारच खालावली होती. त्यामुळे गुब्बूने त्या नोकरीवर पाणी सोडलं. तो गावातल्याच शाळेत इंग्रजी विषय शिकवू लागला.

एक दिवस आज्जी जवळच्याच एका दुकानात गेली होती. ती परत येत असताना अचानक तिला चक्कर आली व ती रस्त्यावरच कोसळली. गुब्बू तेव्हा शाळेत होता. दुकानदाराने त्याला फोन करून बोलावले. आज्जीचा श्वास अजूनही सुरू होता. तिला आता तालुक्याच्या हॉस्पिटलमध्ये दाखल केलं होतं. तिच्या गळ्यावर जणू कोणी गळा दाबायचा प्रयत्न केल्याप्रमाणे लालसर पट्टे उठले होते. तिला नक्की काय झालंय हे डॉक्टरांनाही सांगता येत नव्हतं. श्वास अतिशय मंदगतीने चालू होता. तिला नक्की काय झालंय हे गुब्बूला मात्र समजलं होतं. तिची करणी तिच्यावरच उलटली होती. पण गुब्बू असा सहजासहजी आज्जीला मरू देणार नव्हता. तिला वाचवायचा डॉक्टरांनी खूप प्रयत्न केला. गुब्बूनेही त्याच्या मार्गाने प्रयत्नांची शिकस्त केली. पण उपयोग झाला नाही. हॉस्पिटलच्या बेडवरच आज्जीने शेवटचा श्वास घेतला.

आज्जी वारली तेव्हा गुब्बू लहान मुलासारखा रडला. पण अचानक त्याच्या डोक्यात एक विचार जन्मला. तो विचार होता आज्जीला पुन्हा जिवंत करण्याचा.  त्यासाठीचा विधी त्याने आज्जीच्याच एका पुस्तकात वाचला होता. यशाची शास्वती नव्हती पण तरीही तो प्रयत्न करून पाहणार होता. आता त्याच्या समोर दोन अडचणी होत्या. पहिली अडचण ही होती की त्याला

अंत्यविधी करता येणार नव्हता. कारण एकदा शरीर जाळलं की सगळंच संपलं. दुसरी अडचण सावजाची होती. त्या विधीप्रमाणे त्याला एका जिवंत माणसाचा बळी द्यावा लागणार होता. बराच वेळ विचार केल्यावर दोनीही अडचणींची तोड त्याला सापडली.

गुब्बू कडे आता जास्त वेळ नव्हता. तो हॉस्पिटलमधून निघाला. रात्रीचे दोन वाजले होते. त्याच्या घरासमोरच एक भिकारी बसायचा. रात्री तिथेच पोतं पसरून तो भिकारी झोपायचा. तो कायम दारूच्या नशेत असायचा. गुब्बू घराजवळ पोहोचला. त्याने आजूबाजूला पाहिले, सगळीकडे अंधार होता. एकाही घरात दिवा दिसत नव्हता. गुब्बू घरात जाऊन एक कापड व दोरी घेऊन आला व त्याने हळूच ते कापड झोपलेल्या भिकाऱ्याच्या तोंडाभोवती बांधले. गुब्बूने दोरीने भिकाऱ्याचे हात पाय बांधले. अजूनही भिकारी झोपेतच होता. गुब्बूने भिकाऱ्याला उचलून खांद्यावर टाकले व इकडे तिकडे पाहात अलगद एकेक पाऊल टाकत तो घरात आला. त्याने वरच्या खोलीचे कुलूप उघडून भिकाऱ्याचं मुटकुळ तिथे नेऊन टाकलं.

दुसऱ्या दिवशी त्याचे काही नातेवाईक अंत्यविधीसाठी आले होते. तसेच गावातील लोकही होते. त्या सर्वांना तो आता मोठा धक्का देणार होता. जमलेल्या सर्व लोकांसमोर गुब्बूने एक छोटं भाषण दिलं. आज्जीच्या आठवणी अगदी डोळ्यात पाणी आणून सांगितल्या व शेवटी तो म्हणाला, “आता मी जे काही बोलणार आहे ते तुम्हाला विचित्र वाटेल पण मला बोलणं भाग आहे.” एवढे बोलून तो पुढे बोलू लागला, “काल रात्री माझी लाडकी आज्जी जेव्हा शेवटच्या घटका मोजत होती तेव्हा तिने माझा हात तिच्या हातात घेतला व तिची शेवटची इच्छा बोलून दाखवली. तिच्या मृत्यनंतर तिच्या मृत शरीराचं दहन न करता नदीकाठी दफन करावं अशी तिची शेवटची इच्छा होती.” एवढे बोलून डोळ्यात आलेलं पाणी गुब्बूने शर्टच्या बाहीने पुसलं.

हे ऐकताच लोकांमध्ये एकच गोंधळ उडाला. हे काहीतरी भलतंच होतं. पण म्हातारी किती विचित्र होती हे गावातल्या लोकांना ठाऊक होतं. ती काळी जादू करते असाही काही

लोकांना संशय होता. तसंही फारसं कुणाला काही देणंघेणं नव्हतं. आज्जीच्या इच्छेप्रमाणे नदीकाठीच एक खड्डा खोदून तिचा मृतदेह पुरण्यात आला.

सगळं काही गुब्बूने ठरवल्याप्रमाणे झालं होतं. त्याच दिवशी रात्री गुब्बू नदीकाठावर गेला. आजूबाजूला कोणी नाही याची खात्री करून त्याने जिथे आज्जीला पुरलं होतं त्या जागी खणून आज्जीचा मृतदेह बाहेर काढला. त्याच्या वडिलांच्या लाल कारच्या मागच्या सीटवर त्याने आज्जीला ठेवलं व तो घरी परतला. घरी येताच आज्जीला उचलून त्याने वरच्या खोलीत नेलं व विधीला सुरुवात केली. साधारण दोन तासांनी विधी संपला व झोपेतून जागी झाल्यासारखी गुब्बूची आज्जी पुन्हा जिवंत झाली.

आपल्या समोर उभे बळवंत मास्तरच गुब्बू आहेत हे आता तिघांनाही कळून चुकलं होतं. साक्षात मृत्यूच त्यांच्यासमोर उभा होता.

तिघांच्याही चेहेऱ्याकडे पाहात बळवंत मास्तर म्हणाले, "तुमच्या कडे पाहून मला वाटतंय की तुम्हाला समजलय मी नक्की कोण आहे ते. हा तर आपण कुठे होतो? हा तर आज्जी जिवंत झाल्यावर गुब्बू अर्थात मी या तुमच्या गावात आलो. आज्जी जरी पुन्हा जिवंत झाली असली तरी जगासाठी ती मेली होती. त्यामूळे मी तिला माणसात आणू शकत नव्हतो. तेव्हाच मला या बंगल्याबद्दल समजलं व आज्जीच्या राहण्याची सोय झाली. आधीच हा बंगला भुतांचा बंगला म्हणून बदनाम होता त्यात मी उलट्या पायांच्या म्हातारीची अफवा पसरवून भर घातली. अजून दोन महिन्यांनी आज्जीचा दहावा स्मृतिदिन आहे. म्हणजेच आज्जीचं वाढीव आयुष्य आता फक्त दोनच महिने राहिलं आहे. अर्थात तुमच्या कृपेने ते नक्की वाढेल."

एवढे बोलून संपतानाच अचानक त्याच्या डोक्यात आगडोंबासारखी वेदना उसळली व गुब्बू उर्फ बळवंत खाली कोसळला.

XXXXX


उलट्या
पावलांची
म्हातारी

कॉन्स्टेबल विजय जेव्हा नदीकाठावर पोहोचला तेव्हा पावसाचा जोर वाढला होता. त्याच्या सोबत त्याचे मित्र राजन, सोनू आणि सखाराम सुद्धा होते. नदीकाठावर जाऊन तिथेच चूल पेटवून मस्तपैकी मटण बनवण्याचा त्यांचा प्लॅन होता.

सर्व सामान घेऊन ते घरातून निघाले. पण ते वाटेत असतानाच पावसाने हजेरी लावली व त्यांचा उत्साह ओसरला. ते जेव्हा नदीकाठी पोहोचले तेव्हा चौघेही पूर्ण भिजले होते. तिथेच गाड्या लावून ते एका मोठ्या झाडाखाली थांबले. एवढ्या दूर येऊन परत माघारी जाण्यापेक्षा पाऊस थांबायची वाट पाहत ते त्या झाडाखालीच थांबले होते.

त्यांना येऊन बराच वेळ झाला होता. अजूनही पाऊस थांबायचं नाव घेत नव्हता. विजय वैतागून म्हणाला, "च्यायला आपलं नशीबच खराबाय. म्हनुनच माझं परमोशन होईना. येवढा मस्त मटनाचा प्लॅन केलता तर या पावसानं घान केली."

"परमोशनसाठी चोर पकडावा लागतो. तू किती चोर पकडलेत ते सांग आदी." सोनू विजयला चिडवत म्हणाला.

हे ऐकून विजय चिडला व सोनूच्या मागे धावत सुटला. सोनू काही त्याच्या हातात आला नाही. सोनू पळत पुन्हा झाडापाशी आला.

"कशाला चिडवतो रे त्या विज्याला. तुला माहितीये ना तो किती तापतो?" सखाराम सोनूला म्हणाला. सोनू अजूनही हसत होता.

आता विजयही धापा टाकतच झाडापाशी आला. त्याला चांगलाच दम लागला होता. त्यामुळे त्याचं वाढलेलं पोट वर खाली होत होतं. तो अजूनही सोनूकडे रागाने पाहत होता. शेवटी राजनने त्याला शांत केलं. विजय जेव्हा पोलीस खात्यात भरती झाला तेव्हा चांगलाच सडपातळ होता. पण जशी जशी वर्ष सरत गेली तशी विजयच्या अंगातली चरबीही वाढत गेली.

विजय मुळातच मुलखाचा आळशी होता. आपलं प्रमोशन व्हावं अशी त्याला तीव्र इच्छा होती मात्र त्यासाठी कष्ट करायची मात्र त्याची तयारी नव्हती.

पाऊस थांबला तसे चौघेही खुश झाले व मटणाच्या तयारीला लागले. विजय अर्थातच नुसता बसून होता. बसून बसून कंटाळा आला तेव्हा तो उठला व एक फेरफटका मारण्याच्या उद्देशाने चालू लागला.

थोडा पुढे गेल्यावर त्याला तीन सायकली दिसल्या. त्यातली एक सायकल त्याने ओळखली. ती विजयच्या शेजारी राहणाऱ्या विनूची सायकल होती.

'ही पोरं इथं काय करतायत? तेबी येवढ्या रात्री?' विजयला प्रश्न पडला.

तेवढ्यात रस्त्यावरून एक कार येताना त्याला दिसली. ती लाल रंगाची कार त्याने ओळखली. विजय एका झाडामागे लपून पाहत होता. कार थांबली व बळवंत मास्तर कारमधून उतरला. त्याने आजूबाजूला नजर फिरवली व बंगल्याच्या दिशेने चालू लागला. त्याला पाहताच एक वेगळीच शंका विजयच्या मनात आली. त्या मुलांच्या सायकली आणि आता हा बळवंत मास्तर बंगल्याकडे जातोय. हा या मुलांना ड्रग्स तर देत नसेल ना? तसं असेल तर त्याला रंगेहात पकडायची आयतीच संधी आहे याची विजयला जाणीव झाली. तो परत झाडापाशी गेला. सखाराम आणि सोनू चूल लावण्यात मग्न होते. राजन एकटाच झाडाखाली बसला होता.

विजय राजनला म्हणाला, "आर राजन चल लवकर. मी त्या बळवंत मस्तराला रंगेहात पकडनारे."

"आर तू काय बोलतोय मला कायबी कळना झालंय." राजन म्हणाला.

"आर तू फकस्त माज्याबरोबर चल. बाकी काय इचारु नको." असे म्हणून विजयने राजनला हाताला धरून ओढतच नेला. राजन नाईलाजाने त्याच्या मागून चालू लागला.

ते चालतच बंगल्याच्या दिशेने जाऊ लागले. बंगल्याकडे चाललेला बळवंत मास्तर त्यांना दिसला. बंगल्याच्या प्रवेश द्वारातून आत जाताच बळवंतने त्याच्या जवळच्या पिशवीतून एक पुडी काढली व त्या पुडीतील भुकटी प्रवेशद्वाराखाली शिंपडली. बळवंत पायऱ्या चढून वर गेला व त्याने बंगल्यात प्रवेश केला. हे पाहताच विजयच्या मनातला संशय अजूनच वाढला. हा काहीतरी भानामतीचा प्रकार आहे याची जाणिव त्याला झाली होती. आता पुढे जाणं धोक्याचं होतं. नदी ओलांडून पलीकडे गेलं की दुसऱ्या गावाची हद्द सुरू व्हायची. त्या गावात एक मांत्रिक होता. विजय आता या मांत्रिकाचीच मदत घेणार होता. विजयने राजनला तिथेच थांबायला सांगितलं व तो स्वतः धावतच त्याच्या मोटरसायकल पाशी पोहोचला. विजयला पाहताच सखारामने त्याला हाक मारली. पण विजयला मात्र आता थांबायला वेळ नव्हता. त्याने गाडीला किक मारली व काही क्षणातच तो पूल ओलांडून नदीच्या पलीकडे गेला.

थोड्या वेळातच विजय मांत्रिकाला बरोबर घेऊन आला. दोघेही बंगल्यापाशी आले. त्यांना पाहताच झाडामागे लपलेला राजन बाहेर आला. इतक्या वेळात काहीच हालचाल झाली नसल्याचं राजनने विजयला सांगितलं.

तिथे पोहोचताच मांत्रिकाने पुढे जाऊन त्या राखेवरून नजर फिरवली व तो विजयकडे पाहून म्हणाला, "आप आगे नही गये ये आपने आच्छा किया. नहीतो आपके पेर जल जाते." हे ऐकून विजय व राजनच्या अंगावर काटा आला.

विजय मंत्रिकाला म्हणाला, "तुमीच आता कायतरी करा. कायबी करून आमाला बंगल्यात जायचं हाय."

मांत्रिकाने त्याच्या खांद्यावर अडकवलेल्या पोतडीतून एक डबी बाहेर काढली व त्या डबीतला द्रव त्या भुकटीवर शिंपडून तोंडाने काही मन्त्र पुटपुटले. मांत्रिकाने एक पाऊल प्रवेशद्वारातून आत ठेवलं. काहीच झालं नाही. भुकटीची शक्ती आता निकामी झाली होती. मांत्रिक प्रवेशद्वारातून चालत पुढे गेला. विजय आणि राजनही त्याच्या पाठोपाठ आत आले.

आता ते बंगल्याच्या मुख्य दरवाजासमोर उभे होते. तिघेही भिंतीमागे लपले. सर्वात पुढे विजय उभा होता. त्याने हळूच आत डोकावून पाहिले. एका कोपऱ्यात खुर्चीवर म्हातारी बसली होती. तिच्या समोर बळवंत मास्तर उभा होता. तो तिच्याशी काहीतरी बोलत होता. त्याचा आवाज विजयपर्यंत नीट पोहचत नव्हता. त्यामुळे तो नक्की काय बोलतोय हे कळायला मार्ग नव्हता. पण "आज्जी" हा शब्द एकदोनदा विजयच्या कानावर आला यावर ती म्हातारी बळवंत मास्तरची आजी असावी असं विजयला वाटत होतं. थोड्या वेळाने बोलून झाल्यावर बळवंत तिथून स्वयंपाकघराच्या बाजूच्या खोलीत गेला. तो जाताच म्हातारीने डोळे मिटले. तिचा चेहेरा फारच आनंदी दिसत होता.

म्हातारीला झोपलेला पाहून विजय मांत्रिकाला म्हणाला, "त्या म्हातारीला कायबी करून बेशुद करा. ती जर मधेच उठली तर आपला खेळ खलास होईल."

मांत्रिक अतिशय हळुवारपणे एकेक पाऊल टाकत आत गेला व म्हातारीजवळ जाताच त्याने त्याच्या पोतडीतून एक पुडी बाहेर काढली. तोंडाने काही मंत्र पुटपुटले व ती पुडी उघडून म्हातारीच्या तोंडासमोर धरून फुंकर मारली. पुडीतील भूकटी म्हातारीच्या नाकात गेली.

मांत्रिकाने हाताने खूण करताच विजय आणि राजन चोरपावलाने खोलीत आले.

खोलीच्या मधोमध एक मोठा खांब होता. तिघेही त्या खांबाआड लपले. विजय सर्वात पुढे उभा होता. त्याला समोरच्या खोलीच्या दारातच पाठमोरा उभा असलेला बळवंत दिसला. विजय तसा दूर उभा होता व त्यात बळवंत दारातच उभा असल्यामुळे विजयला पूर्ण खोली पाहता येत नव्हती. त्याला फक्त पाठमोरा उभा बळवंत व खुर्चीला बांधलेला विनू दिसत होता. बळवंत मध्ये उभा असल्यामुळे विनूही अर्धाच दिसत होता. बळवंत काहीतरी सांगत होता. बळवंतचा आवाज विनूला स्पष्ट ऐकू येत नव्हतं. तो कोणत्यातरी गुब्बू नावाच्या मुलाची गोष्ट सांगतोय हे बऱ्याच वेळाने विजयला समजलं. गोष्ट संपताच तो बळवंतला रंगेहात पकडणार होता.

विजय आता मनोमन प्रमोशनची स्वप्न रंगवत होता. प्रमोशनच्या नुसत्या विचारानेच त्याच्या अंगात उत्साह संचारला होता. ‘कायबी झालं तरी आता या नालायकाला सोडनार नाय.’ असे मनात म्हणून विजयने म्हातारीच्या खुर्चीच्या बाजूला ठेवलेली काठी उचलली व तो परत खांबाच्या मागे येऊन थांबला. बराच वेळ झाला तरी बळवंत अजूनही बोलतच होता. आता विजयची सहनशक्ती संपली होती. तो पुढे गेला व पूर्ण ताकदीनिशी त्याने काठी बळवंतच्या डोक्यात हाणली. त्याच क्षणी बळवंत खाली कोसळला. त्याचं डोकं फुटून रक्त वाहात होतं. काही मिनिटातच बळवंतने प्राण सोडला.

आपल्याकडून किती मोठी चूक झाली आहे हे विजयला समजलं होतं. विजयने खरंतर बळवंतला बेशुद्ध करायच्या उद्देशानेच काठी मारली होती पण घाव थेट वर्मावरच लागल्याने बळवंतचा खेळ खल्लास झाला होता.

विजय बराच वेळ डोकं धरून बसला होता. एवढी मोठी संधी त्याने त्याच्या मुर्खपणामुळे घालवली होती. प्रमोशन तर आता फारच लांबची गोष्ट होती. जे काही घडलं होतं ते जर गावात कुणाला कळालं तर नोकरी तर गेलीच शिवाय पूर्ण आयुष्य तुरुंगात.

“आता जे झालं ते झालं. अन तू काय मुद्दाम मारलं नायस ना. मग कशापायी उगी तरास करून घेतो. अन तसंही तो बळवंत नालायकच होता. उलटा तूच त्या पोरांचा जीव वाचवला.” राजन विजयच्या जवळ गेला व त्याला समजावत म्हणाला.

हे ऐकताच एक गोष्ट त्याच्या लक्षात आली. खरंच की, आपण तर उलट या निष्पाप मुलांना त्या राक्षसाच्या तावडीतून सोडवलंय. आपण कुणाचा तरी जीव वाचवलाय या विचारानेच विजयच्या मरगळलेल्या पश्चातापदग्ध मनाला नवी उभारी आली. विजय उठून उभारला व त्याने आजूबाजूला पाहिले. राजन त्याच्या बाजूला उभा होता. मांत्रिक केव्हाचाच पळाला होता. म्हातारी खुर्चीवर अजूनही झोपल्यासारखी दिसत होती.

विजय समोरच्या खोलीत गेला. समोर तीन खुर्च्यांवर तीन मुलं बसली होती. तिघांचेही हात, पाय व तोंड बांधलं होतं. विजयने त्यांना सोडवलं. तिघेही विजयकडे आदरपूर्वक नजरेने पाहात होते. त्यांच्या जवळ जात तो म्हणाला, “हे बघा पोरांनो, तुमी आज जे काय बी पाहिलं ते कुनालाबी सांगायचं नाही. समजलं?” तिघांनीही मान हलवली. खरंतर हे सांगायची काहीच गरज नव्हती.

आता राजन व विजयपुढे दोन प्रश्न उभे होते. बळवंतच्या मृत शरीराची विल्हेवाट काशी लावायची आणि म्हातारीचं काय करायचं. विजय म्हातारीजवळ गेला व त्याने हळूच म्हातारीचं मनगट हातात घेतलं तिची नाडी तपासायला. नाडी बंद होती. म्हातारी खुदाला प्यारी झाली होती. मांत्रिकाच्या भुकटीमुळे म्हातारी मेली असावी असा विजय आणि राजनचा समज झाला होता. पण तसं नव्हतं. त्याआधीच म्हातारीने प्राण सोडला होता. “आज्जी तू काहीच काळजी करू नकोस. आता मला आयते तीन तीन सावज मिळाले आहेत. आता पुढची तीस वर्ष तरी तुला मरण नाही.” असे जेव्हा बळवंत तिला म्हणाला तेव्हा आपण अजून तीस वर्षे जगणार या विचारानेच तिला अतिआनंद झाला होता व या आनंदानेच तिचा घात केला.

आता विजय आणि राजनसमोर एका ऐवजी दोन मृतदेह होते. बराच वेळ विचार केल्यावर बंगल्याच्या मागेच खड्डा खणून मृतदेह पुरायचा त्यांनी निर्णय घेतला. विजय, राजन आणि तिन्ही मुलं बंगल्याच्या बाहेर आली. “पोरांनो आता तुमि जावा तुमच्या घरी. मी काय बोललो ते फकस्त ध्यानात ठिवा.” विजय म्हणाला. विजय व राजनचे आभार मानून सनी, नंदू आणि विनू तिथून निघाले.

विजय आणि राजनने दोन्ही मृतदेह पोत्यात भरले व ते ओढतच बंगल्याच्या मागच्या बाजूला घेऊन आले. खड्डा खणायला त्यांना बराच वेळ लागला. एकदाचे मृतदेह खड्ड्यात पडले व दोघांच्याही मनावरचं ओझं कमी झालं. खड्डा बुजवून ते नदीकाठावर परतले.

“आर कुठं गेलता येवडा येळ? तुमची वाट बघून आमी दमलो राव! शेवटी राहवना म्हनून पोट भरून घेतल. आता बसा तुमीबी जेवाया.” दोघांच्या घामेजलेल्या चेहेऱ्यांकडे पाहत सोनू म्हणाला. “लय मोठी स्टोरी हाय! सांगीन कवातरी.” विजय म्हणाला व खाली चटईवर बसून दोघांनीही मटणाच्या तुकड्यांवर ताव मारला.

सलग चार दिवस बळवंत मास्तर शाळेत आले नाहीत. त्यांचा फोनही लागत नव्हता. मुख्याध्यापकांनी त्यांच्या घरी शिपाई पाठवले पण घराला कुलूप होतं. त्यांना आता काळजी वाटत होती. पण बळवंत मास्तरांचा कुठेच पत्ता लागत नव्हता.

रविवारचा दिवस उजाडला. आज कामावर जावं लागणार नाही म्हणून विजय खुश होता. सकाळचे नऊ वाजले होते तरी तो निवांत लोळत पडला होता. त्याने सहजच खिडकीतून पाहिले तेव्हा त्याला त्याचा मित्र शंकर येताना दिसला. शंकरला येताना पाहताच विजय उठून बसला.

“बातमी कळली का रे?” शंकर दारात उभा राहूनच म्हणाला.

“कसली बातमी?” विजयने विचारलं.

“त्या बळवंत मास्तरची रे.” एका हाताने सँडलचा पट्टा सोडवत शंकर म्हणाला.

बळवंत मास्तरचं नाव ऐकताच विजयच्या हृदयाची धडधड अचानक वाढली. इतकी की स्वतःच्या हृदयाचे ठोके सुद्धा तो ऐकू शकत होता.

“काय झालं त्येचं?” विजय कसाबसा म्हणाला.

“बळवंत मास्तर सहा दिवसांपासून बेपत्ता झालाय हे तुला माहीतच असेल पण आज पहाटे घाटोळांची मेघा कपडे धुवायला नदीकाठावर गेली होती. तिला तिथे बळवंत मास्तराची ती लाल कार दिसली. मास्तरला उलट्या पायांच्या म्हातारीने खाल्लं असंच आता सगळे म्हणतायत.” हे ऐकताच विजयच्या जीवात जीव आला.

शंकर पुढे बोलला “मलापण तेच वाटतंय. पण या बळवंत मास्तराला कोणी सांगितलं होतं तिथे तडमडायला! तू सांग ना तुला काय वाटतंय खरंच उलट्या पायांच्या म्हातारीने खाल्ला असेल मास्तरला?” शंकरने विजयला प्रश्न विचारला. पण विजय काहीच बोलला नाही, तो फक्त हसला.

समाप्त

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. निरंजन कुलकर्णी यांचं ई साहित्यवरचं हे पाचवं पुस्तक.** यापुर्वीची त्यांची चारही पुस्तके वाचकांना आवडली. गूढरम्य कथाबीजांच्या आधाराने ते तितकेच सुंदर वर्णन करून डोळयांसमोर एक ताजेतवाने, मोहक चित्र उभे करतात. नव्या पिढीला अपील करणारी त्यांची सुटसुटीत कथानके असतात. सहज सुंदर शब्दरचना व ओघवती शैली यांमुळे त्यांचा एक फ़ॅनवर्ग निर्माण होत आहे. पाचवे पुस्तकही वाचकांना नक्की आवडेल. आपल्याकडून येणाऱ्या प्रतिसादांच्या आधारे ते अत्यंत मेहनतीने आपल्या लेखनाचा कस वाढवत नेत आहेत. त्यांची गणना मराठीतील प्रमुख लेखकांमध्ये होईल असा आम्हाला विश्वास आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत. नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला

ई साहित्य प्रतिष्ठान

टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

**बस्स. अजून काय पाहिजे?**

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य प्रतिष्ठान